# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,गडचिरोली
दिनांक-१७/०२/२०१९

## निबंधस्पर्धेच्याविजेत्यांनामा. पोलीस उपमहानिरीक्षकांच्या हस्ते बक्षीस वितरण

गडचिरोली पोलीसदलाच्या व आदिवासीविकास विभाग यांच्या वतीने आपला महाराष्ट्रदर्शन सहल सुवर्णजयंती सहल योजने अंतर्गत२२ वी महाराष्ट्रदर्शन सहल दिनांक १५/०१/२०१९ ते २९/०१/२०१९ या कालावधीत आयोजितकरण्यात आली होती. या सहलीमधील सहभागी विदयार्थ्यांनी महाराष्ट्रातीलविविध स्थळांना भेटीदिल्यानंतरत्यांच्यामध्येएकनवा उत्साह निर्माण झाला होता. महाराष्ट्रातीलइतर भागाचा विकास पाहुन मुले भारावुनगेले होते. त्यांच्यातील उत्साहाचा विचारकरुनत्यांचेगडचिरोली जिल्हयाबाबत मनोगतत्यांनी आपल्या शब्दांत लिहावे म्हणुन**"महाराष्ट्रदर्शन सहल "**या विषयावर निबंध स्पर्धाघेण्यात आली होती. या स्पर्धेत सर्व विदयार्थ्यांनी सहभागी होवुन उत्कृष्ट निबंध लेखनकेले. त्यापैकी०३ सर्वोत्कृष्ट निबंधांना मा. श्री. अंकुशशिंदे(भा.पो.से.)पोलीसउपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांचे हस्ते प्रोत्साहनपर रोख बक्षीस देण्यात आले.

सहलीतील सहभागी ८० विदयार्थ्यांमधुन अनुक्रमेकु. ज्योती.राजुनैताम रा.कांदळी ता.एटापल्ली शासकिय आश्रम शाळा, जारावंडीहिस प्रथमक्रमांकाचे रोख बक्षीस १५००/- रु., अजय भिमा येरमा रा. किष्टय्यापल्ली ता. सिरोचा, शासकिय आश्रम शाळा, जिमलगट्टा यांसव्दितीयक्रमांकाचे रोख बक्षीस १०००/- रु. व अभिमन्यूदेवाजीसिडाम रा. आरेवाडाता. भामरागड, जय पेरसापेन आश्रम शाळा, भामरागड यांस तृतीयक्रमांकाचेरोख बक्षीस ८००/- रु. देण्यात आले. स्पर्धेतीलविजेत्यांचे अभिनंदनकरुन सहभागी सर्व विदयार्थ्यांना मा. श्री.शैलेश बलकवडे (भा.पो.से.), पोलीस अधीक्षकगडचिरोली यांनी उज्वल भविष्याबाबत शुभेच्छादिल्या. सदर बक्षीस वितरणकार्यक्रम मा. श्री.महेंद्र पंडीत (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक, (प्रशासन) मा. डॉ. हरी बालाजी(भापोसे)अपर पोलीस अधीक्षक (अभियान), मा. डॉ. मोहित कुमार गर्ग (भापोसे)अपर पोलीस अधीक्षक (नक्षल) यांच्या उपस्थितीत पार पडला.


गडचिरोली पोलीस दल
द्वारा आयोजित
व्हॉलीबॉल चषक


गडचिरोली पोलीस दल
द्वारा आयोजित
व्हॉलीबॉल चषक-२०१९


गडचिरोली पोलीस दल
द्वारा आयोजित
व्हॉलीबॉल चषक-२०१९